आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२६ नोव्हेंबर २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवा निमित्त राज्यभरात विविध कार्यक्रम
- संविधानाच्या माध्यमातून देशानं सामाजिक न्याय आणि सर्वसमावेशक विकासाचं ध्येय साध्य केलं, असं राष्ट्रपतींचं प्रतिपादन
- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा राजीनामा राज्यपालांना सुपूर्द / नवीन सरकारस्थापनेपर्यंत काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून पाहणार कामकाज
- प्रसिद्ध  उद्योजक शशिकांत रुईया यांचं निधन

**आणि**

- राज्यात थंडीचा कडाका वाढला

**<><><><><>**

भारतीय संविधान दिन आज देशभरात सर्वत्र साजरा करण्यात आला. ७५ वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी भारत सरकारनं राज्यघटनेचा स्वीकार केला होता. त्यानिमित्त आजपासून वर्षभर विविध  कार्यक्रमाचं आयोजन केलं जाणार आहे. संविधानाच्या मसुदा समितीचे अध्यक्ष डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाचा गौरव करण्यासाठी २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय २०१५ ला सरकारने घेतला. देशात सर्वत्र संविधान दिनानिमित्त पदयात्रा काढण्यात येत आहेत तसंच संविधानाच्या उद्देशिकेचं जाहीर वाचन करण्यात येत आहे. आकाशवाणी मुंबईच्या आवारात आज संविधान दिनानिमित्त उद्देशिकेचं वाचन करण्यात आलं.

**<><><><><>**

संविधानाच्या माध्यमातून देशानं सामाजिक न्याय आणि सर्वसमावेशक विकासाचं ध्येय साध्य केलं, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. संविधान दिनानिमित्त नवी दिल्लीत संविधान सदनाच्या सेंट्रल हॉलमध्ये आयोजित भव्य कार्यक्रमाला त्या संबोधित करत होत्या. आपलं संविधान प्रजासत्ताक व्यवस्थेचा पाया असून नागरिकांचा वैयक्तिक आणि सामाजिक स्वाभिमान सुनिश्चित करण्याचं काम याद्वारे होतं, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात प्रगतीशील आणि सर्वसमावेशक विचारांची पेरणी केली, असं त्या म्हणाल्या. **उपराष्ट्रपती** जगदिप धनखड यांनीही या कार्यक्रमाला संबोधित केलं. कार्यक्रमाच्या प्रारंभी, संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त काढलेल्या ७५ रुपयांच्या नाण्याचं, तसंच टपाल तिकिटाचं अनावरण राष्ट्रपतींनी केलं. संविधानाच्या निर्मितीचा इतिहास आणि प्रक्रिया उलगडून दाखवणाऱ्या दोन पुस्तकांचं अनावरणही यावेळी झालं. संविधानाच्या संस्कृत आणि मैथिली भाषेतल्या प्रती यावेळी प्रकाशित करण्यात आल्या. त्याआधी संविधान निर्मितीची माहिती देणारी चित्रफित **उपस्थितांना** दाखवण्यात आली. या कार्यक्रमाला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू, लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी, राज्यसभेचे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे उपस्थित होते.

**<><><><><>**

राज्यभरात आज संविधान दिन उत्साहानं साजरा होत आहे. संविधानाच्या अमृतमहोत्सवानिमित्त राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी राजभवनात तिथले अधिकारी, कर्मचारी तसेच पोलिसांसमवेत राज्यघटनेच्या उद्देशिकेचं वाचन केलं.

**मुंबई**त मंत्रालयात झालेल्या कार्यक्रमात काळजीवाहू उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संविधानाच्या प्रास्ताविकेचं वाचन केलं. यावेळी मुख्य सचिव तसंच इतर मान्यवर उपस्थित होते.

हमारा संविधान हमारा स्वाभिमान या संकल्पनेंतर्गत नेहरु युवा केंद्राने मुंबईत वरळी इथं संविधान दिन साजरा केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेडिकोस असोसिएशन आणि सामाजिक समरसता मंच कोकण प्रांत यांनी गिरगाव चौपाटी ते राजभवन अशी प्रभात फेरी काढली.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या टिळक भवन या मुख्यालयात, **नवी मुंबई** महापालिका मुख्यालयात तसंच मुंबई विद्यापीठात संविधानाच्या उद्देशिकेचं सामुहिक वाचन करण्यात आलं. **परभणी, सिंधुदुर्ग, सांगली** तसंच **धुळे** इथल्या जिल्हाधिकारी कार्यालयात, **अकोला** जिल्हा परिषदेच्या प्रांगणात आणि **वाशिम** जिल्ह्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात संविधान उद्देशिकेचं वाचन करण्यात आलं. **नागपूर**मध्ये युवा ग्रॅज्युएट फोरम आणि संविधान फाऊंडेशननं वॉक फॉर संविधान रॅलीचं आयोजन केलं होतं. **धाराशिव** इथं मतदार जनजागृती समितीने संविधान जनजागृती रॅली काढली होती. **छत्रपती संभाजीनगर** इथं क्रांती चौकातून भारतीय संविधान, सन्मान, सुरक्षा, संवर्धन समितीने रॅली काढली. **नांदेड**मध्ये आज सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभागाने भारतीय संविधान दिनानिमित्त ‘हर घर घर संविधान’ प्रभात फेरी काढली.

**<><><><><>**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज पदाचा राजीनामा दिला. १४ व्या विधानसभेचा कार्यकाळ आज संपत असल्यानं शिंदे यांनी राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्याकडे मुख्यमंत्री पदाचा राजीनामा सुपूर्द केला. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्री दादा भुसे, मंत्री दीपक केसरकर उपस्थित होते. नवीन सरकार स्थापन होईपर्यंत काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून काम पहावं, असं राज्यपालांनी एकनाथ शिंदे यांना सांगितलं. आता नवनिर्वाचित आमदारांची १५ वी विधानसभा गठित करण्याची आणि नव्या

सरकारच्या स्थापनेची प्रक्रिया सुरू होईल. त्यामुळे आता नवीन सरकार अस्तित्वात येईपर्यंत एकनाथ शिंदे हे काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून काम पाहतील. नवीन सरकारस्थापनेबाबत अद्याप निर्णय झालेला नाही.

<><><><><>

प्रसिद्ध उद्योजक आणि एस्सार उद्योगसमूहाचे सह संस्थापक शशिकांत रुइया यांचं काल मध्यरात्रीच्या सुमाराला मुंबईत निधन झालं. ते ८१ वर्षांचे होते. दीर्घ आजारावर अमेरिकेत उपचार घेऊन ते महिनाभरापूर्वीच मुंबईत परतले होते. शशिकांत रुईया यांच्या निधनाबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

<><><><><>

१२७ लाईट एअर डिफेन्स रेजिमेंटचे जवान हवालदार सुधाकर राठोड सीमेवर कर्तव्य बजावत असताना अति थंडी आणि बर्फाच्या प्रभावाने काल त्यांचा मृत्यू झाला. त्यांचं पार्थिव नांदेड जिल्ह्यातल्या त्यांच्या मूळ गावी हिरानगर तांडा इथं येणार असून तिथंच अंत्यसंस्कार होतील.

<><><><><>

नागपुरात विद्यार्थ्यांना सहलीला घेऊन जाणाऱ्या बसला झालेल्या अपघातात एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाला आहे. नागपूर आणि वर्धा जिल्ह्यांच्या सीमेवर असलेल्या पेंढरी गावाजवळ बसचालकाचं नियंत्रण सुटल्यानं हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. या दुर्घटनेत अनेक विद्यार्थी जखमी झाले असून त्यांना मिहान इथल्या एम्स रुग्णालयात दाखल केलं आहे.

<><><><><>

भंडारा जिल्ह्यात डोंगरला आणि खैरलांजी गावाच्या मध्यभागी असणाऱ्या पूलावरून आज सकाळी ट्रक कोसळला. या घटनेत वाहक जागीच ठार, तर चालक

गंभीर जखमी झाला आहे. चालकाला तुमसर इथल्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल केलं आहे.

**<><><><><>**

नंदुरबार जिल्ह्यातल्या नवापुर तालुक्यात कोंडाईबारी घाटात झालेल्या बस आणि ट्रकच्या अपघातात १ जण ठार तर १५ जण जखमी झाले. घाटात तेल सांडल्यानं हा अपघात झाल्याचं सांगण्यात येत आहे. मृतांची संख्या वाढण्याची शक्यता असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**<><><><><>**

सव्वीस अकराच्या मुंबई दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या पोलीस अधिकारी आणि जवानांचा आज सोळावा स्मृतीदिन. मुंबई पोलिस मुख्यालयात, राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसंच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी या हल्ल्यातल्या हुतात्म्यांना पुष्पचक्र वाहून आदरांजली व्यक्त केली. हुतात्म्यांचे कुटुंबीय आणि उपस्थित आजी - माजी पोलिस अधिकाऱ्यांची भेट राज्यपालांनी यावेळी घेतली.

**<><><><><>**

केंद्र सरकारच्या सहकार से समृद्धी या योजनेंतर्गत ग्रामीण भागातल्या विविध कार्यकारी सोसायट्यांच्या माध्यमातून ५०० ते १ हजार मेट्रिक टन क्षमतेचे धान्य गोदाम उभारले जाणार आहे. केंद्रीय सहकार मंत्रालय, नाबार्ड तसचं राज्य सहकार मंत्रालयाचा हा संयुक्त उपक्रम असून तो राज्यातल्य प्रत्येक जिल्ह्यात राबवला जाईल. त्यातल्या नाशिक जिल्ह्यात सात विविध कार्यकारी सोसायट्यांशी आज करार झाला.

**<><><><><>**

मुंबईत, लोअर परळ परिसरातल्या १ हजार ४५० मिलीमीटर व्यासाच्या तानसा मुख्य जलवाहिनी दुरुस्तीचं काम २८ नोव्हेंबर रात्री दहा वाजल्यापासून ते २९ नोव्हेंबर संध्याकाळी आठ वाजेपर्यंत करण्यात येणार आहे. त्यामुळे या कालावधीत जी दक्षिण आणि जी उत्तर विभागातल्या लोअर परळ, करीरोड, प्रभादेवी, सेनापती बापट मार्ग या परिसरातला पाणीपुरवठा काही ठिकाणी पूर्णतः तर काही ठिकाणी अंशतः बंद राहणार आहे. तसंच ना. म. जोशी मार्ग परिसरातही पाणीपुरवठा बंद राहणार आहे. त्यामुळे नागरिकांनी पाण्याचा वापर जपून करावा, असं आवाहन मुंबई महानगरपालिकेने केलं आहे.

**<><><><><>**

मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसलगतच्या भुयारी मार्गामध्ये हवा खेळती राहण्यासाठी व्हेंटिलेशन प्रणाली बसवली जाणार आहे. यात ९ जेट पंखे आणि अधिक क्षमतेचे मध्यवर्ती पंके बसवले जाणार आहेत. या प्रणालीची मदत आगीसारख्या घटना घडल्यावरही होणार आहे. भुयारात आग लागल्यावर मध्यवर्ती पंखे अधिक वेगानं फिरतील आणि धूर वेगानं बाहेर फेकला जाईल, असं प्रशासनानं सांगितलं.

**<><><><><>**

राज्यात थंडीचा कडाका वाढला आहे. गेल्या चोवीस तासात, संपूर्ण राज्यात तुरळक ठिकाणी किमान तापमानात किंचित घट झाली. राज्यात सर्वात कमी किमान तापमान अहमदनगर इथं ९ पूर्णांक ७ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं. येत्या दोन दिवसात राज्याच सर्वत्र हवामान कोरडं राहिल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**